खडी गंमत महोत्सव २०१८-२०१९
आयोजन खर्चास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. खडीगं २९१९/प्र.क्र. २१/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१९

वाचा :- संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सां.का.सं/०२०१, दिनांक ५ जानेवारी, २०१९

प्रस्तावना :-

खडीगंमत हे महाराष्ट्रातील पुरातन लोकनाटय आहे. आधुनिक युगात या लोप पावत चाललेल्या लोककलांचे जतन, संवर्धन व त्यांच्या वाढीस प्रोत्साहन देण्याच्या हेतूने शासनातर्फे खडीगंमत महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवाच्या आयोजन खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कन्हान, जि. नागपूर या ठिकाणी फेब्रुवारी, २०१९ या महिन्यात खडीगंमत महोत्सव २०१८-१९ आयोजित करण्यासाठी येणाऱ्या रुपये ४,६९,०००/- (रुपये चार लाख एकोणसत्तर हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या खर्चास खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	तपशिल (सात दिवस)	अंदाजित खर्चाची रक्कम
१.	कलापथकाचे मानधन रु.१५,०००/- x ७ मंडळे प्रवास खर्चासहित	१,०५,०००/-
२.	रंगमंच हॉल	२५,०००/-
३.	ध्वनी व प्रकाश योजना ७ दिवस	५५,०००/-
४.	बैठक व्यवस्था ७ दिवस	२०,०००/-
५.	कलाकार निवास व भोजन खर्च	२०,०००/-
६.	कलाकार / इतर मान्यवरांचा चहा व अल्पोपहार	१०,०००/-
७.	निमंत्रण पत्रिका छपाई, हँडबिल, बॅनर, रिक्षाद्वारे प्रसिध्दी, छायाचित्रे, व्हिडीओ शुटिंग	५०,०००/-
८.	अंतर्गत वाहतूक खर्च	१५,०००/-
९.	जाहिरात	२५,०००/-
१०.	पुस्तके कलापथकप्रमुख	१०,०००/-
११.	मानचिन्हासह प्रमाणपत्र छपाई व लेखन खर्च ७ कलापथकप्रमुख	३५,०००/-
१२.	समन्वयक मानधन	१०,०००/-
१३.	निवेदक एकत्रित मानधन	१०,०००/-
१४.	स्वयंसेवक १० x रु.२००/- x ७ दिवस	१४,०००/-
१५.	जनरेटर	३५,०००/-
१६.	संकीर्ण खर्च	३०,०००/-
	एकूण खर्च रुपये	**४,६९,०००/-**

२. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा खर्च मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृती, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२) राज्य नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य, नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सव (२२०५ १५०७) ५० इतर खर्च या लेखाशीर्षाखालील सन २०१८ - २०१९ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग ३, अ.क्र.४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये विभागास प्राप्त अधिकारानुसार तसेच समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग यांचे शासन निर्णय क्र. सांकासं १३७६/८४५७-XII, मंत्रालय, मुंबई, दिनांक ८ मार्च, १९७७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर प्रस्तावास वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थसं ३, दिनांक २ एप्रिल, २०१८ मधील परिच्छेद क्र. ६ (अ) (ब) (क) व ७ (७) (८) ची पूर्तता होत असून उर्वरित सर्व परिच्छेद व परिशिष्टातील उर्वरित सर्व अटी या प्रकरणी लागू होत नाहीत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०२२६१७०१०४१३२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.02.26 17:02:39 +05'30'

(विलास रा. थोरात)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १/२ मुंबई/नागपूर महाराष्ट्र राज्य
८. महालेखापाल (लेखा परीक्षा)- १/२ मुंबई/नागपूर महाराष्ट्र राज्य
९. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१०. निवड नस्ती, सां.का.४